# ७. लोकप्रशासन

या प्रकरणात आपण लोकप्रशासनाचा अर्थ, लोकप्रशासनाची उत्पत्ती, त्याची भूमिका, महत्त्व आणि व्याप्ती समजून घेणार आहोत. भारतातील प्रशासकीय व्यवस्थेचा अभ्यासही या प्रकरणात करणार आहोत.

आपण काही प्रश्नांनी सुरुवात करूया. आपण राज्यशास्त्रात कशाचा अभ्यास करतो? प्रशासन म्हणजे काय? खासगी आणि सार्वजनिक प्रशासनात काय फरक आहे?

राज्यशास्त्रात राज्य आणि शासन यांचा अभ्यास केला जातो. स्थानिक, राज्य, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवरच्या राजकारणाचा अभ्यास केला जातो. समाज स्वतःचे प्रशासन कसे करते हेही अभ्यासले जाते. लोकप्रशासन हा राज्यशास्त्राचा एक भाग आहे. 'कृतिशील शासन' असे आपण ज्याला म्हणू यावर लोकप्रशासनाचा भर असतो. लोकशाही पद्धतींनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची गरज असते. हे कार्य शासनाचे कार्यकारी मंडळ करते, त्याला लोकप्रशासन असे म्हणतात.

शासनाच्या तीन शाखा आहेत : कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. शासनाच्या कार्यकारी मंडळाचे दोन प्रकार आहेत.

(अ) राजकीय कार्यकारी मंडळ : ज्यामध्ये निर्वाचित मंत्र्याचा समावेश असतो.

(ब) कायमस्वरूपी कार्यकारी मंडळ : नोकरशाही यांची नियुक्ती केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) किंवा महाराष्ट्र लोकसेवा आयोग (MPSC) इत्यादींनी आयोजलेल्या स्पर्धा परीक्षांमधून होते.

प्रशासन ही प्रक्रिया रोजच्या जीवनात सर्वत्र आढळते. प्रक्रिया म्हणून प्रशासन सार्वजनिक व खासगी दोन्ही संस्थांमध्ये दिसून येते. 'प्रशासन' या संज्ञेचा अर्थ विविध घडामोडींचे व्यवस्थापन. हे व्यवस्थापन सार्वजनिक किंवा खासगी क्षेत्रांमध्ये असू शकते. लोकप्रशासन या विषयात शासनाच्या क्रिया व प्रक्रियांचा अभ्यास केला जातो.

### लोकप्रशासनाची व्याख्या

शासनाने तयार केलेली उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी मानवी व भौतिक संसाधनांचे संघटन व व्यवस्थापन म्हणजे लोकप्रशासन.

लोकप्रशासनाच्या काही व्याख्या :

**हर्बर्ट सायमन :** सामान्य मान्यतेनुसार लोकप्रशासन म्हणजे राष्ट्रीय, प्रादेशिक व स्थानिक शासनांच्या कार्यकारी मंडळाची सर्व कार्ये.

**ड्वाईट वॉल्डो :** लोकप्रशासन म्हणजे राज्याच्या घडामोडींसाठी उपयोजन केलेली व्यवस्थापनाची कला आणि शास्त्र.

**ल्युथर ग्युलिक :** लोकप्रशासन म्हणजे प्रशासनाच्या शास्त्राचा तो भाग आहे जो शासनाच्या कार्याशी म्हणजेच प्रामुख्याने कार्यकारी मंडळाच्या कार्याशी निगडित असतो.

### राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन यांच्यातील परस्परसंबंध

वरील चर्चेप्रमाणे, सार्वजनिक धोरण आणि कायदे कसे तयार केले जातात याबद्दलचा अभ्यास राज्यशास्त्रात केला जातो. या विषयात राजकीय पक्ष आणि इतर संघटना, इतर शासकीय संस्था, उदाहरणार्थ, संसद, निवडणूक आयोग इत्यादींचा अभ्यास केला जातो. लोकप्रशासन या सार्वजनिक धोरणांची व कायद्यांची अंमलबजावणी करते.

शासनाला अनेक विशेष कार्ये करावी लागतात. जसे, की कायदा व सुव्यवस्था राखणे, शिक्षणाची तरतूद करणे, सार्वजनिक आरोग्य राखणे, कृषी क्षेत्राला उत्तेजन देणे, सामाजिक सुरक्षितता राखणे, सामाजिक कल्याण, स्वच्छता, दळणवळणाची सुविधा इत्यादी प्रत्येक कार्य हे विशेष आहे. त्यासाठी तज्ज्ञता आवश्यक असते. उदाहरणार्थ, सार्वजनिक आरोग्यासाठी डॉक्टर, कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी प्रशिक्षित पोलीस. शासन जेव्हा या कार्यांचे प्रशासन स्वतः करते किंवा शासकीय संस्थांमार्फत करते, तेव्हा ही कार्ये लोकप्रशासनाच्या व्याप्तीत समाविष्ट होतात. त्यामुळे जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी, पोलीस अधिकारी, अंगणवाडी कर्मचारी इत्यादी हे सर्व भारतातील लोकप्रशासनाचे घटक आहेत. शासनाच्या विविध योजना आणि कार्यक्रमांच्या अंमलबजावणीत ते शासनाला मदत करतात. जेव्हा वरील काही कार्ये (उदा., शिक्षणाची तरतूद किंवा आरोग्य सेवा) ही खासगी संस्था किंवा अशासकीय संस्था या संस्थांकडून पूर्ण केल्या जातात, त्याला खासगी प्रशासन किंवा व्यावसायिक प्रशासन असे म्हणतात.

**सामान्यत: लोकप्रशासनात पुढील बाबींचा समावेश होतो.**

- शासनाची कार्ये : प्रामुख्याने कार्यकारी मंडळाची कार्ये
- सार्वजनिक घडामोडी आणि कार्यांचे व्यवस्थापन
- लोककल्याण आणि सार्वजनिक हित.

### लोकप्रशासनाची व्याप्ती

लोकप्रशासनाची व्याप्ती ही संक्षिप्त आणि व्यापक अशा दोन प्रकारच्या दृष्टिकोनातून बघता येते.

#### (i) संक्षिप्त दृष्टिकोन

या दृष्टिकोनात फक्त शासनाच्या कार्यकारी मंडळाच्या कार्यावर भर दिलेला दिसून येतो. ग्युलिक आणि उर्विक या दोघांनी POSDCORB या प्रसिद्ध संक्षेपामार्फत हा दृष्टिकोन मांडला. या दृष्टिकोनात लोकप्रशासनाच्या व्याप्तीमध्ये पुढील बाबींचा समावेश केलेला आहे.

**P-Planning (नियोजन) :** प्रशासनातील पहिला टप्पा हा नियोजनाचा असतो. ज्यामध्ये व्यापक आराखडा किंवा रूपरेषा तयार केली जाते. ती राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक या तिन्ही स्तरांवर होते उदा., नीती आयोगाने 'बॉटम-अप ॲप्रोच'चा अवलंब केला आहे. ज्यामध्ये स्थानिक पातळीवर नियोजन आधी होते आणि नंतर वरील स्तरांवर नियोजन केले जाते.



**माहीत आहे का तुम्हांला ?**

**राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था :** नीती आयोग ही केंद्रीय मंत्रिमंडळाच्या प्रस्तावाने १ जानेवारी २०१५ रोजी स्थापन झालेली संस्था आहे. सार्वजनिक धोरणांविषयी मार्गदर्शन करणारी व सल्ला देणारी ही संस्था आहे. भारत सरकारचा 'विचार गट' (Think Tank) असे त्याला समजले जाते. दीर्घकालीन योजना, कार्यक्रम तयार करताना 'नीती आयोग' भारत सरकारला तसेच राज्य सरकारला आवश्यक ती तांत्रिक मदत करते.

**O-Organisation (संघटन) :** नियोजित उद्दिष्टे, ध्येय पूर्ण करण्यासाठी शासकीय संघटना, यंत्रणा तयार केली जाते ज्यामार्फत कार्याचे व्यवस्थापन व समन्वय साधला जातो. उदा., अखिल भारतीय सेवा, केंद्रीय, राज्य व स्थानिक सेवा.

**S-Staffing (कर्मचारी भरती) :** मानवी संसाधन हा प्रशासकीय व्यवस्थेचा कणा असतो. प्रशासकीय यंत्रणेमध्ये सक्रिय सहभाग घेणाऱ्या

कर्मचाऱ्यांची भरती केली जाते व त्यांना प्रशिक्षण घ्यावे लागते. त्यांच्यासाठी अनुकूल परिस्थिती निर्माण करणे हे देखील महत्वाचे आहे. उदा., केंद्रीय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोग यांच्यामार्फत केली जाणारी भरती.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

भारतातील केंद्रीय स्तरावरील भरती करणारी संस्था म्हणजे केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC). अखिल भारतीय सेवा आणि गट अ, गट ब केंद्रीय सेवा यासाठीच्या परीक्षा व नियुक्ती यांची जबाबदारी या संस्थेची आहे.


महाराष्ट्रातील प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या भरतीसाठी महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोग (MPSC) ही संस्था निर्माण केली आहे.

**D-Directing (मार्गदर्शन) :** प्रशासन हे एक अविरत कार्य आहे. त्यामुळे निर्णय घेणे आणि त्या निर्णयांना सामान्य व विशिष्ट आज्ञा, निर्देश यांच्याशी जोडणेही आवश्यक आहे.

**CO-Coordination (समन्वय) :** प्रशासन ही एक क्लिष्ट आणि परस्परसंबंधी प्रक्रिया आहे. त्याकरिता संघटनेचे विविध शाखा, विभाग, गट यांच्या कार्यामध्ये समन्वय साधणे आवश्यक आहे. कामामध्ये एकसूत्रता आणण्यासाठी आणि संघर्ष टाळण्यासाठी समन्वयाची मदत होते.

**R-Reporting (अहवाल तयार करणे) :** प्रशासनात सुरू असलेले काम तसेच पूर्ण झालेली कामे याबद्दलचा अहवाल वरिष्ठांसमोर सादर करणे महत्वाचे आहे. त्यामुळे प्रशासनात उत्तरदायित्व आणि जबाबदारीची भावना निर्माण होते.

**B-Budgeting (अंदाजपत्रक) :** प्रत्येक कार्यामध्ये आर्थिक बाब महत्त्वाची भूमिका बजावते. त्यामुळे लेखापरीक्षण, करनियोजन आणि त्यावरील नियंत्रण अंदाजपत्रकामार्फत ठेवले जाते.




**करून पहा.**

तुम्हांला तुमच्या महाविद्यालयात क्रिकेट सामना आयोजित करायचा आहे. विद्यार्थ्यांनी गट तयार करावेत. प्रत्येक गटाने पुढील कार्य करावे.

**गट अ :** कार्यक्रमाचे नियोजन-तारीख ठरवणे, स्थळ निश्चित करणे इत्यादी.

**गट ब :** सामन्यासाठी कोणी कोणती जबाबदारी घ्यायची हे निश्चित करणे. प्रत्येक कार्यासाठी छोट्या समित्या तयार करणे.

**गट क :** महाविद्यालयातील अधिकाऱ्यांशी समन्वय साधणे. (शिक्षक, प्राचार्य, इतर कर्मचारी)

**गट ड :** या कार्यासाठीचे अंदाजपत्रक तयार करणे.

### (ii) व्यापक दृष्टिकोन

लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात शासनाच्या तिन्ही शाखांच्या कार्यांचा समावेश होतो. फक्त कार्यकारी मंडळाच्या कार्यावर भर देणाऱ्या संक्षिप्त दृष्टिकोनापेक्षा व्यापक दृष्टिकोन वेगळा आहे. लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात

कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ, न्यायमंडळ यांचे कार्य व त्यांच्यातील परस्परसंबंध यांचा समावेश केला जातो. सहकारात्मक सांघिक प्रभाव म्हणून याकडे बघितले जाते. यामध्ये धोरण निर्मितीवर लक्ष दिले जाते. त्यामुळे एका व्यापक राजकीय प्रक्रियेचाच तो एक भाग होतो.

व्यापक स्वरूपामध्ये लोकप्रशासन हे खासगी संस्था व व्यक्ती यांच्याशी संवाद व सहयोग करते ज्यामुळे मूलभूत सुविधांचा योग्य पुरवठा करता येईल. यामध्ये शासनाच्या विशेष कार्यांचा समावेश केला जातो. उदा., संरक्षण, वित्त पुरवठा, शिक्षण, आरोग्य सेवा इत्यादी. याचा अर्थ लोकप्रशासनाच्या व्यापक दृष्टिकोनात POSDCORB सारख्या प्रशासनाचे तंत्र तसेच इतर मूलभूत बाबींचा विचार केला जातो.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**उद्योगाचे सामाजिक उत्तरदायित्व (Corporate Social Responsibility) :**

कंपन्या आपल्या व्यवसायामध्ये सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणिवा सामावून घेण्याचा प्रयत्न करतात. CSR म्हणजे दानधर्म करणे नव्हे, तर तो समाज सुधारण्याचा एक प्रयत्न आहे. विकसनशील देशांमध्ये प्रदूषण रोखणे, आपत्ती शमन, स्वच्छ पाणी, शैक्षणिक कार्यक्रम इत्यादींचा CSR मध्ये समावेश केला जातो.

## लोकप्रशासनाचा विकास

प्राचीन काळापासून अनेक विचारवंतांनी प्रशासकीय विचार आणि व्यवहारामध्ये आपले योगदान दिले आहे. कौटिल्याचे 'अर्थशास्त्र' हे प्राचीन भारतातील प्रशासनाविषयी आहे. ॲरिस्टॉटल यांचे 'पॉलिटिक्स' आणि मॅकियावेली यांचे 'द प्रिन्स' हे देखील प्रशासनासंदर्भातील ग्रंथ आहेत, पण लोकप्रशासनाच्या पद्धतशीर अभ्यासाचे श्रेय अठराव्या शतकातील जर्मनी व ऑस्ट्रिया येथील कॅमेरॅलिझमच्या (cameralism) प्रणालीला दिले जाते. या प्रणालीत शासकीय व्यवहाराच्या पद्धतशीर व्यवस्थापनावर भर दिलेला होता.

**माहीत आहे का तुम्हांला?**

**कॅमेरॅलिझम :** सतराव्या व अठराव्या शतकातील 'शास्त्रांच्या' प्रणालीला कॅमेरॅलिझम असे संबोधतात. जर्मनी आणि ऑस्ट्रिया येथील सम्राटांच्या प्रशासकीय यंत्रणा सुधारण्यासाठीचे हे प्रयत्न. यातील महत्त्वाचे संदर्भ आजही लोकप्रशासनासाठी उपयुक्त आहेत.

लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म अमेरिकेत झाला. वूड्रो विल्सन यांनी पहिल्यांदा लोकप्रशासनाच्या अभ्यासाची गरज मांडली. 'लोकप्रशासनाचा अभ्यास' या त्यांच्या १८८७ सालच्या शोधनिबंधाने लोकप्रशासन शास्त्राचा पाया रचला. शासनाची कार्यक्षमता वाढवण्याची गरज आहे असे प्रतिपादन करणारे ते प्रथम राजकीय नेते होते. शासनाचा अविभाज्य भाग, पण सगळ्यांत कमी ज्याची चर्चा होते ते प्रशासन आहे असे त्यांनी मांडले.

आज प्रशासनाची व्याप्ती विस्तारली आहे आणि तुलनात्मक लोकप्रशासन, विकास प्रशासन, नव लोकप्रशासन, नव लोकव्यवस्थापन, सार्वजनिक धोरण आणि सुशासन या क्षेत्रांचा यात समावेश झाला आहे. लोकप्रशासनाच्या व्याप्तीत सार्वजनिक धोरण हे सर्वांत नवे क्षेत्र समाविष्ट झाले आहे. आधुनिक काळात लोकप्रशासन फक्त अंमलबजावणीपर्यंत मर्यादित नसून त्याचा भर धोरण निर्मितीवरही आहे.

## सार्वजनिक धोरण

वाढता परस्पर संपर्क, तंत्रज्ञानातील शोध, जागतिकीकरण आणि त्यामुळे उद्‌भवणारी आव्हाने यामुळे आज शासनव्यवस्था गुंतागुंतीची झाली आहे. त्यामुळे सार्वजनिक क्षेत्रामध्ये शासन आज कार्यांच्या सामान्य प्रशासनापलीकडे जाऊन अनेक कार्ये करते. आज शासन प्रामुख्याने जनकल्याणासाठी सार्वजनिक धोरण निर्मिती व अंमलबजावणी यांकडे लक्ष देत आहे. शासनव्यवस्था समजून घेणाऱ्या या नव्या दृष्टिकोनाला सार्वजनिक धोरण असे म्हणतात.

भारतात ग्रामीण क्षेत्रात वीज उपलब्धता ही मोठी समस्या आहे. त्यामुळे या क्षेत्रांमध्ये वीजपुरवठा करणे हे सरकारचे कार्य आहे. यासाठी भारत सरकारने 'राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजना' तयार केली. भारतात वीज नसलेल्या क्षेत्रांमध्ये वीजपुरवठा करण्यासाठीचे हे सार्वजनिक धोरण आहे. सार्वजनिक धोरणाचे दुसरे उदाहरण म्हणजे 'आयुष्मान भारत'. कोणालाही आर्थिक अडचण न होता सर्वांना चांगल्या दर्जाची आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी हे या योजनेचे उद्‌दिष्ट आहे.

सार्वजनिक धोरण हे तीन टप्प्यांतून समजून घेता येईल.

(i) **धोरणांची निवड :** नागरिकांच्या हितासंबंधीचे विविध प्रश्न असतात. त्या प्रश्नांची प्राधान्यक्रमाने निवड मंत्री, राजकारणी, संसद सदस्य, नोकरशाह किंवा इतर अधिकारी करतात. त्यानंतर हे प्रश्न कसे सोडवायचे याबद्‌दलच्या विविध पर्यायांची चर्चा होते. उदा., शहरात पाणीपुरवठा कसा करायचा किंवा मलेरिया विरोधी कार्यक्रम कसे राबवायचे या चर्चेच्या आधारे एखादी योजना किंवा कार्यक्रम निश्चित केला जातो.

(ii) **धोरणांची निष्पत्ती :** या टप्प्यात प्रत्यक्ष धोरण अंमलबजावणी होते, ज्यामधून धोरणाची निष्पत्ती दिसून येते.

(iii) **धोरणाचा परिणाम :** तिसऱ्या टप्प्यात धोरणाचा परिणाम समजून घेतला जातो. यामध्ये धोरणाचे मूल्यांकन होते. धोरणाची उद्‌दिष्ट्ये आणि धोरणाचे परिणाम तपासले जातात.

खालील उदाहरणातून आपण सार्वजनिक धोरण निर्मिती आणि त्याची अंमलबजावणी समजून घेऊ. कचरा व्यवस्थापन आणि कचऱ्याचा विनियोग या क्षेत्रामध्ये तुमच्या भागातील स्थानिक शासनाला समस्या भेडसावतात. स्वच्छता आणि सार्वजनिक आरोग्य यांबद्‌दल गंभीर समस्या आहेत. लोकांचे प्रतिनिधी (नगरसेवक, ग्रामपंचायतीचे पदाधिकारी व सदस्य इत्यादी), शासकीय अधिकारी (वॉर्ड अधिकारी) आणि स्थानिक रहिवासी यांच्यात चर्चा होते आणि कचऱ्याच्या विनियोगासंदर्भात सार्वजनिक धोरण निश्चिती होते.

समजा, कचरा निर्मितीच्याच ठिकाणी विभागला गेला आणि तो त्या विभागलेल्या अवस्थेत गोळा करून त्यावर प्रक्रिया करण्याचे ठरवले तर मग या निर्णयाच्या अंमलबजावणीच्या पद्‌धतीचे नियोजन करावे लागेल. ही झाली धोरणाची निवड.

दुसरा टप्पा म्हणजे धोरणाची अंमलबजावणी म्हणजेच धोरणाची निष्पत्ती. या निर्णयाच्या अंमलबजावणीत शासकीय तसेच अशासकीय संस्थांचा सहभाग घेता येतो.

तिसरा टप्पा आहे धोरणाचा परिणाम. ज्यामध्ये अपेक्षेप्रमाणे परिणाम झाला का हे तपासले जाते. हा मूल्यांकनाचा टप्पा आहे.

अंमलबजावणीतील समस्या समजून घेऊन पुढील काळात त्या दुरुस्त करता येतात.

**करून पहा.**

तुमच्या परिसरात कचरा व्यवस्थापन कसे होते हे शोधा.

**भारतातील प्रशासकीय प्रणाली :** ब्रिटिशांनी आपल्या काळात निर्माण केलेल्या संस्था आणि आराखडा याचा प्रभाव भारताच्या प्रशासनावर दिसतो. ब्रिटिशांच्याही आधी भारतात संरचित प्रशासकीय व्यवस्था अस्तित्वात होती. सम्राट चंद्रगुप्त मौर्य यांच्या काळातील प्रशासनासंबंधी कौटिल्याच्या अर्थशास्त्रात संदर्भ आढळतात. गुप्त राजवंश, मुघल राजघराणे आणि छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रशासकीय प्रणालीतील योगदान महत्त्वाचे आहे. ब्रिटिशांनी केंद्राने नियंत्रित केलेली प्रशासकीय व्यवस्था भारतात आणली. याची अंमलबजावणी अनेक महत्त्वाच्या कायद्यातून करण्यात आली आहे. उदा., भारत सरकार कायदा १९०९, भारत सरकार कायदा १९१९ आणि भारत सरकार कायदा १९३५.



लाल बहादुर शास्त्री
राष्ट्रीय प्रशासन अकादमी, मसूरी

स्वातंत्र्यानंतर भारताने आपण राज्यांचा संघ आहोत असे जाहीर करून संघराज्य शासनव्यवस्थेचा स्वीकार केला. भारताने संसदीय लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार केला. भारताच्या संविधानात दिलेल्या व्यापक मूल्यांवर व उद्दिष्टांवर भारताची प्रशासकीय व्यवस्था अवलंबून आहे. राजकारणी, मंत्री, नोकरशाह आणि प्रशासन प्रक्रियेत सहभागी असलेल्या सगळ्यांना ध्येय, दिशा दाखवण्याचे काम ही मूल्ये करतात. स्वातंत्र्य, समता, न्याय, बंधुता आणि धर्मनिरपेक्षता ही ती मूल्ये आहेत.

भारतातील प्रशासनाची सामान्य रूपरेषा समजून घेऊया.

भारतीय प्रशासन दोन स्तरांवर समजून घ्यायला हवे.

१. भारताची संघराज्य शासनव्यवस्था ज्यामध्ये त्रिस्तरीय प्रशासकीय संरचना दिसते – राष्ट्रीय, राज्य आणि स्थानिक स्तर.

२. शासनाच्या तीन शाखा : कायदेमंडळ, कार्यकारी मंडळ आणि न्यायमंडळ. प्रधानमंत्री आणि मंत्रिमंडळ यांचा कार्यकारी मंडळात समावेश होतो. हे मंत्री विविध मंत्रालय व विभाग सांभाळतात.

कायदेमंडळाचे (केंद्रात संसद आणि राज्यात विधिमंडळ) कार्य हे कायदे तयार करणे आणि कार्यकारी मंडळावर नियंत्रण ठेवण्याचे आहे. कायद्यांचा अर्थ लावणे आणि न्यायदान करणे हे न्यायमंडळाचे कार्य आहे.

**भारतातील प्रशासकीय संरचना**

राष्ट्रीय (केंद्र सरकार)
↓
प्रादेशिक/राज्य (राज्य शासन)
↓
स्थानिक शासन
↙ ↘

शहर प्रशासन
↓
महानगरपालिका/नगरपालिका/नगरपरिषद/कटक मंडळ

ग्रामीण प्रशासन
↓
जिल्हा : जिल्हा परिषद
↓
ब्लॉक/गट : पंचायत समिती
↓
गाव : ग्रामपंचायत



मंत्रालय, मुंबई

**प्रशासन कार्य कसे करते?**

(i) राष्ट्रीय पातळीवर केंद्र सरकारची कार्ये ही विविध मंत्रालयांमार्फत (विभाग/खाते) होतात. उदा., कृषी मंत्रालय, आरोग्य, गृह, संरक्षण इत्यादी. मंत्रालयात प्रत्येक खात्यासाठी मंत्री असतात. मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली नोकरशाह किंवा प्रशासकीय यंत्रणा असते. मंत्रालयांव्यतिरिक्त निवडणूक आयोग, केंद्रीय लोकसेवा आयोग, मागासवर्गांसाठीचे राष्ट्रीय आयोग, नीती आयोग इत्यादी संस्था आहेत. यासाठीही प्रशासकीय अधिकारी किंवा नोकरशाह यांची आवश्यकता असते.

(ii) राज्य स्तरावर देखील विविध मंत्रालये आणि आयोग शासनाचे काम करतात. केंद्र सरकारप्रमाणेच राज्याचे मंत्रालयही मंत्र्यांच्या नेतृत्वाखाली असते आणि या स्तरावर देखील नोकरशाहांची आवश्यकता असते.

(iii) स्थानिक स्तरावर दोन प्रकारचे प्रशासन आहे. शहर आणि ग्रामीण प्रशासन. जिल्हा स्तरावर जिल्हाधिकारी सर्वोच्च पदावर असतात. मोठ्या शहरांमध्ये महापालिका आयुक्त हे महानगरपालिकेचे नेतृत्व करतात. ग्रामीण भागांमध्ये तालुका स्तरावर तहसीलदार हे प्रशासक असतात.

(iv) राजकीय नेतृत्व आणि प्रशासकीय यंत्रणा यांच्यात जवळचे संबंध आहेत. केंद्र आणि राज्य स्तरावर मंत्रालये व विभाग मंत्र्याच्या नेतृत्वाखाली असतात. स्थानिक स्तरावर देखील राजकीय नेते व प्रशासकीय यंत्रणा यांची जवळीक असते. उदा., ग्रामीण भागात जिल्हा परिषदेचे अध्यक्ष, पंचायत समितीचे सभापती किंवा ग्रामपंचायतीचे सरपंच हे प्रशासनाच्या सतत संपर्कात असतात. शहरी भागात महानगरपालिका व नगरपालिकेत निर्वाचित सदस्य प्रशासनाच्या संपर्कात असतात.

(v) प्रशासनातील प्रत्येक स्तरातील अधिकाऱ्यांची भरती ही शासनाने घेतलेल्या स्पर्धा परीक्षांमधून होते. केंद्र सरकारच्या पातळीवर केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) आणि कर्मचारी निवड आयोग (Staff Selection Commission) या दोन संस्था परीक्षा आयोजित करतात. राज्य स्तरावर या परीक्षा राज्य लोकसेवा आयोगामार्फत घेतल्या जातात.

(vi) नोकरशाह हे राजकीय तटस्थतेच्या सिद्धान्तांचे पालन करतात. त्यांची बांधिलकी ही संविधानाशी आहे. राजकीय पक्षाशी नाही.

पुढील प्रकरणांमध्ये आपण विकास प्रशासनाबाबत अधिक माहिती घेणार आहोत.

**करून पहा :** तुमच्या घर/शाळा/महाविद्यालयाजवळील कोणत्याही सरकारी कार्यालयाला भेट द्या. जसे, की पंचायत समिती कार्यालय, जिल्हा परिषद, महानगरपालिका इत्यादी. तेथे चालणाऱ्या कामाचे निरीक्षण करा. कार्यालयीन कर्मचाऱ्यांशी संवाद साधा. तुम्हांला आलेल्या अनुभवांवर वर्गात चर्चा करा व त्यावर माहिती लिहा.

## स्थानिक प्रशासन व्यवस्था

### जिल्हा प्रशासन (ग्रामीण)

- **राजकीय**
  - जिल्हा परिषद अध्यक्ष
  - ↓ पंचायत समिती सभापती
  - ↓ ग्रामपंचायत सरपंच
- **प्रशासकीय (विकासात्मक)**
  - मुख्य कार्यकारी अधिकारी
  - ↓ गट विकास अधिकारी (BDO)
  - ↓ ग्रामसेवक (ग्रामपंचायतीचे सचिव म्हणून कार्य)
- **प्रशासकीय**
  - जिल्हाधिकारी
    - महसूल प्रशासन
    - कायदा व सुव्यवस्था
    - भूधारण
  - ↓ तहसीलदार/तलाठी
- **न्यायमंडळ**
  - जिल्हा न्यायालय

### जिल्हा प्रशासन (शहरी)

- **राजकीय**
  - **महानगरपालिका**
    - **महापौर** (लोकसंख्या ३ लाख ते अधिक)
  - **नगरपालिका**
    - (पालिकेचा अध्यक्ष)
  - **कटक मंडळ**
    - (प्रशासक म्हणून सेनादलाचा अधिकारी)
- **प्रशासकीय**
  - **महापालिका आयुक्त**
  - **जिल्हाधिकारी**
    - महसूल, प्रशासन, कायदा, व सुव्यवस्था, भूधारण

**Please see the following websites for further information:**

**The Study of Administration: Woodrow Wilson**
Source: Political Science Quarterly, Vol. 2, No. 2 (Jun., 1887), pp. 197-222
Published by: The Academy of Political Science
Stable URL: Quarterly.http://www.jstor.org
Volume II. June, 1887. Number2. Political Science Quarterly.
http://www.iupui.edu/~spea1/V502/Orosz/Units/Sections/u1s5/Woodrow_Wilson_Study_of_Administration_1887_jstor.pdf

## स्वाध्याय

**प्र.१ (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधान पूर्ण करा.**

१. प्रशासकीय व्यवस्थेचा .......... हा कणा असतो.
(भौतिक संसाधन, मानवी संसाधन, नैसर्गिक संसाधन, भौगोलिक संसाधन)

२. POSDCORB हा संक्षेप ग्युलिक आणि .......... यांनी मांडला.
(वूड्रो विल्सन, हर्बट सायमन, उर्विक, ड्वाईट वाल्डो)

**(ब) चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

(i) कौटिल्य - अर्थशास्त्र
(ii) ॲरिस्टॉटल- द पॉलिटिक्स
(iii) मॅकियाव्हेली - रिपब्लिक

**(क) दिलेल्या विधानासाठी समर्पक संकल्पना लिहा.**

१. अठराव्या शतकातील जर्मनी व ऑस्ट्रिया येथील शासकीय व्यवहाराच्या पद्धतशीर व्यवस्थापनांची प्रणाली -

२. कंपन्यांनी सामाजिक आणि पर्यावरणविषयक जाणिवा सामावून घेण्याचा केलेला प्रयत्न -

**प्र.२ खालील विधाने चूक की बरोबर सकारण स्पष्ट करा.**

१. प्रशासनातील पहिला टप्पा हा कर्मचारी भरतीचा असतो.

२. लोकप्रशासन या विद्याशाखेचा जन्म भारतात झाला.

**प्र.३ सहसंबंध स्पष्ट करा.**

१. राज्यशास्त्र आणि लोकप्रशासन

२. राष्ट्रीय पातळीवरील प्रशासन व राज्य पातळीवरील प्रशासन

**प्र.४ पुढील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

१. प्रशासनाचे कार्य कसे चालते ते स्पष्ट करा.

२. सार्वजनिक धोरण निर्मितीचे टप्पे स्पष्ट करा.

**प्र.५ दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे पुढील प्रश्नाचे सविस्तर उत्तर लिहा.**

लोकप्रशासनाची व्याप्ती याबाबत खालिल मुद्द्यांच्या आधारे स्पष्टीकरण लिहा.

(i) नियोजन (ii) संघटन (iii) कर्मचारी भरती
(iv) समन्वय (v) अहवाल तयार करणे.

**उपक्रम**

भारत सरकारच्या गृहमंत्रालयाचा अलीकडचा वार्षिक अहवाल पहा. त्यातील ठळक कार्यांची नोंद करा.

***